पाच पिढ्यांच्या विश्वासाची अखंड परंपरा
माणक ज्वेलर्स
फूलचंद माणकलाल अँण्ड कं.
१९०७, एम.जी.रोड.
चोपडा, जि. जळगाव
पिन-४२५१०७ ९३७०५८१५५३

सुविचार - मित्रत्व ही आयुष्यातील सर्वात सुंदर गोष्ट आहे; तिचे जतन करा.

महाराष्ट्राचे निडर दैनिक
# शौर्य मराठी
RNI-MAHMAR/2023/89125

| | | |
|---|---|---|
| सेन्सेक्स | ७६,००९.७० | -४७९.२६ (०.६३%) |
| डॉलर | ₹ ९५.६६ | |

आजचे तापमान (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ४० | २८ |
| दिल्ली | ४१ | २६ |
| मुंबई | ३४ | ३१ |
| नागपूर | ४४ | ३१ |
| पुणे | ३७ | २५ |

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | गुरुवार, दि. २८ मे २०२६ | वर्ष २ रे | अंक १९६ किंमत : ५ रु. | पाने ४

सूर्योदय - सूर्यास्त
स.-५:४६ संध्या-७:०४

सोने – चांदी
सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)
१,५४,८००/- २,५८,०००/-
Rate By : माणक ज्वेलर्स, चोपडा

# कांदा प्रश्नावर १० दिवसांत तोडगा निघणार

## अमित शहांसोबत मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची माहिती

वृत्तसंस्था । मुंबई

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील मंत्रिमंडळ आज दिल्लीला गेलं आहे. शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी राज्याचं मंत्रिमंडळ दिल्लीत बैठकीसाठी गेलं. केंद्रीय गृह तथा सहकार मंत्री अमित शाह, केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांच्यासोबत महत्त्वाची बैठक पार पडली आहे. या बैठकीत अत्यंत सकारात्मक चर्चा झाल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.**

या बैठकीत ऊस उत्पादक शेतकरी, साखर कारखानदारी, कांदा उत्पादक शेतकरी आणि आंबा उत्पादक शेतकरी यांच्याबाबत काय-काय चर्चा झाली, केंद्र सरकारकडून काय मागण्या मागण्यात आल्या आणि केंद्र सरकारने काय मागण्या मान्य केल्या? याबाबत देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मक प्रतिक्रिया दिली. केंद्र सरकारने पुढच्या १० दिवसांत काही सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन दिले आहे, ते निर्णय नेमके काय आहेत ते फडणवीसांनी सांगितलं आहे.

महाविकास आघाडीकडून तसेच इतर विरोधी पक्षांकडून शेतकऱ्यांच्या कांद्याच्या भावासंदर्भात सत्ताधाऱ्यांविरोधात मोठे आंदोलन केले होते. महाविकास आघाडीकडून काल (दि. २६ मे) नाशिक येथे रस्ता जाम आंदोलन करण्यात आले होते. या आंदोलनात शेतकऱ्यांचाही मोठा सहभाग दिसून आला होता.

बैठकीत झालेल्या चर्चेविषयी सांगताना फडणवीस म्हणाले, साखर उद्योग आणि कांद्याच्या प्रश्नावर आज महाराष्ट्र सरकार आणि केंद्र सरकार यांच्यात अतिशय सकारात्मक बैठक पार पडली. कांद्याचा आणि साखर उद्योगात शेतकरी अत्यंत कठीण प्रश्नांना तोंड देत होते. त्याबाबत नक्कीच साधकबाधक चर्चा झाली. आम्हाला १० दिवसांत सकारात्मक निर्णय देण्याचे आश्वासन मिळाले आहे. पुढे बोलताना फडणवीस म्हणाले, महाराष्ट्रातील सर्व शेतकरी आणि साखर उद्योगाला दिलासा देणारी घटना आज घडलेली आहे. आम्ही अत्यंत समाधानी आहोत. केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा, केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांच्या उपस्थितीत अत्यंत चांगली चर्चा झाली. मी भारत सरकारचे मनापासून आभार मानतो. आता सध्या कांद्यावरील निर्यात बंदी उठवली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना नक्कीच फायदा होईल, अशी माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली.



### दिलीप वळसे पाटील काय म्हणाले?

बैठकीबाबत बोलताना दिलीप वळसे पाटील म्हणाले, या बैठकीत कांदा प्रश्नावर मोठा तोडगा निघेल, अशी आशा राज्यातील शेतकऱ्यांना होती. त्यानुसार या प्रश्नावर सकारात्मक चर्चा झाली आहे. विशेष म्हणजे कांद्याच्या निर्यातीवर बंदी नाही. तशी बंदी असेल तर उद्यापर्यंत ती बंदी उठवू, असे आश्वानस अमित शाह यांनी दिले आहे.

# पंतप्रधान नरेंद्र मोदी पनौती हर्षवर्धन सपकाळांची पुन्हा टीका




वृत्तसंस्था । मुंबई

**पंतप्रधान नरेंद्र मोदी पनौती आहेत, अशी टीका पुन्हा एकदा काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी मोदींवर केली. सपकाळ यांनी दलिंदर या शब्दाचे स्पष्टीकरण देत पनौती शब्द वापरून पुन्हा मोदींवर टीकास्त्र सोडले. महाविकास आघाडीच्या नेत्यांची विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बैठक पार पडली. या बैठकीनंतर सपकाळ यांनी टिळक भवन, मुंबई येथे माध्यमांशी संवाद साधला. यावेळी सपकाळ यांनी आषाढी कार्तिकेच्या वेळेत होणाऱ्या एसआयआर प्रक्रियेवरही सवाल उपस्थित केला.**

एसआयआरसाठी निश्चित करण्यात आलेल्या आषाढी वारीच्या कालखंडावरुन हर्षवर्धन सपकाळ यांनी निवडणूक आयोग आणि भाजपावर टीका केली. या कालखंडात (एसआयआर) महाराष्ट्रात मोठा उत्सव असतो, वारकऱ्यांना मतदार याद्यांमधून वगळण्यासाठी, भक्तांना वगळण्यासाठी भाजपाने आयोगाशी संगनमताने हा घाट घातला आहे, असा आरोप सपकाळ यांनी केला. तसेच, हा घाट यशस्वी होऊ देणार नाही, असेही सपकाळ म्हणाले.

**दिल्लीतून हात रिकामा घेऊन माघारी घेऊ नका सपकाळ**

कांदाप्रश्नावरुन काल (मंगळवारी) तीन तास रस्ता जाम केल्याचे, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष सपकाळ म्हणाले. या आंदोलनात राष्ट्रवादी (शरद पवार) चे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, रोहित पवार, अंबादास दानवेही होते. या आंदोलनानंतर राज्य सरकारच्या अर्ध्या मंत्रिमंडळाला दिल्लीला जावे लागत आहे. (पान २ वर)

## थोडक्यात

### उद्धव ठाकरे गटाला मोठे खिंडार

**मुंबई ।** वसई-विरार शहरात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाला मोठा राजकीय धक्का बसला असून युवासेनेचे पालघर जिल्हाप्रमुख सिद्धेश रवींद्र जोगळे यांच्यासह अनेक प्रमुख पदाधिकाऱ्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे. सलग ४४ वर्षे शिवसेनेशी एकनिष्ठ राहिलेले ज्येष्ठ शाखाप्रमुख प्रभाकर गोपाळ पाटील यांनीही भाजपचा झेंडा हाती घेतल्याने ठाकरे गटाच्या संघटनात्मक रचनेला मोठे खिंडार पडल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

### एआयमुळे व्हाईट कॉलर नोकऱ्यांवर गदा

**नवी दिल्ली ।** एआयचा वापर वाढल्यामुळे टेक क्षेत्रातील अनेक नोकऱ्या धोक्यात आल्याचे चित्र २०२५ पासून दिसत आहे. वर्षभरापासून जगातील मोठ्या टेक कंपन्यांनी हजारोंच्या घरात नोकरकपात केली आहे. यापुढच्या काळातही ही कपात सुरूच राहणार असल्याचे दिसत आहे. भारतातील उच्चशिक्षितांच्या व्हाईट कॉलर नोकऱ्या धोक्यात आल्या आहेत, असे विधान सौरभ मुखर्जी यांनी केले आहे. एकेकाळी माणसांकडून केले जाणारे काम आता एआयकडून होणार असल्यामुळे या नोकऱ्या धोक्यात आल्या आहेत. मार्सेलस इनव्हेस्टमेंट मॅनेजर्सचे संस्थापक एका पॉडकास्टमध्ये बोलताना सौरभ मुखर्जी म्हणाले, २०३० पर्यंत एआय ओटोमेशनमुळे भारतात जवळपास १८ दशलक्ष नोकऱ्यांवर प्रभाव पडू शकतो. याबदल्यात फक्त ३ दशलक्ष नव्या नोकऱ्या निर्माण होतील.

### एसटीला नफ्याकडे नेण्यासाठी व्यापक कृती आराखडा

**मुंबई ।** राज्य परिवहन (एसटी) महामंडळाच्या सातत्याने तोट्यात चालणाऱ्या विभागांना आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि नफ्यात आणण्यासाठी महामंडळाने व्यापक कृती आराखडा तयार केला आहे. याअंतर्गत प्रत्येक तोट्यातील विभागासाठी प्रादेशिक व्यवस्थापक दर्जाच्या किंवा त्यापेक्षा वरिष्ठ अधिकाऱ्यांची ङ्गपालक अधिकारीफ म्हणून नियुक्ती करण्यात येणार असल्याची घोषणा परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केली.

# पाकिस्तान अब्राहम करारात सामील होऊ शकत नाही

वृत्तसंस्था । इस्लामाबाद

**पाकिस्तानने इस्रायलबरोबरचे संबंध सामान्य करण्यासाठी अब्राहम करारामध्ये सामील व्हावे, असे आपल्याला वाटत नसल्याचे पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ यांनी म्हटले आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केलेल्या आवाहनानंतर आसिफ यांनी ही प्रतिक्रिया दिली आहे.**

आपल्या मूलभूत विचारधारेशी विसंगत असलेल्या कोणत्याही करारात आपण सामील होऊ नये, असे आपले वैयक्तिक मत आहे, असे आसिफ एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखती दरम्यान म्हणाले. पूर्व जेरुसलेमला राजधानी बनवून १९६७ पूर्वीच्या सीमेवर पॅलेस्टिनी राज्य स्थापन होईपर्यंत इस्रायलला स्वीकारायचे नाही, ही आपल्या देशाची दीर्घकालीन भूमिका आहे.



त्यामुळे अब्राहम करारात सामील होणे आम्हाला मान्य नाही, ही आमची अगदी स्पष्ट भूमिका आहे, असेही ते म्हणाले. पाकिस्तानचा पासपोर्ट इस्रायलमध्ये प्रवास करण्यासाठी वैध नाही, याचा स्पष्ट उल्लेख पासपोर्टवर केला गेल्याचेही त्यांनी नमूद केले. आसिफ यांचासह पाकिस्तानमधील इतर अनेक राजकारण्यांचा ज्यू राष्ट्र असलेल्या इस्रायलसोबत संबंध सामान्य करण्याच्या कोणत्याही कल्पनेला तीव्र विरोध आहे. गेल्या महिन्यात, त्यांनी इस्रायलवर त्या प्रदेशात नरसंहार केल्याचा आरोप करत, इस्रायलला मानवतेवरील शाप म्हटले होते.

# रेल्वे स्थानकातील खाद्यपदार्थांच्या दरवाढीबाबत मध्य रेल्वेचे घूमजाव

वृत्तसंस्था । मुंबई

**देशभरात पेट्रोल, डिझेल, खाद्यतेलाच्या दरात झालेल्या वाढीचा परिणाम अत्यावश्यक आणि जीवनावश्यक वस्तूंवर झाला आहे. सर्व वस्तूंच्या किंमती वाढल्या असून, त्याचा फटका सर्वसामान्य नागरिकांना बसला आहे.**

रेल्वे स्थानकात स्वस्तात मिळणाऱ्या वडापावचा तर १ जूनपासून ७ रुपयांनी वाढविण्याबाबतचे परिपत्रक नुकतेच जारी करण्यात आले होते. परंतु, प्रवाशांनी विरोध केल्यानंतर हे परिपत्रक मागे घेण्यात आले.

मध्य रेल्वेच्या स्थानकांवरील स्टॅटिक केटरिंग युनिट्समध्ये विकल्या जाणाऱ्या अनेक खाद्यपदार्थांच्या दरात १ जून २०२६ पासून वाढ सुचविणारे परिपत्रक जारी करण्यात आले होते. उप मुख्य वाणिज्य व्यवस्थापक (दावे व खानपान), सीएसएमटी यांच्या कार्यालयातून २५ मे रोजी जारी करण्यात आलेल्या परिपत्रकानुसार ङ्गए - ला कार्टफपदार्थांच्या दरपत्रकात सुधारणा करण्याचे नमूद केले होते. मुंबई, भुसावळ, सोलापूर, नागपूर, पुणे विभागांतील वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापकांना याबाबत सूचना (पान २ वर)

# विमानसेवा १ जूनपासून महागणार

## एअर इंडियासह इंडिगोने घेतला निर्णय

वृत्तसंस्था । नवी दिल्ली

**आखाती देशातील युद्धांच्या झळा आता हळूहळू सगळ्यांनाच बसताना दिसत आहेत. एकीकडे इंधनाचे दार मागच्या काही दिवसांपासून वाढतच आहेत तर दुसरीकडे हवाई प्रवासासंबंधी कंपन्यांनी महत्वाचा निर्णय घेतला आहे. ज्यामुळे आता विमानसेवेत बदल होणार असून प्रवास देखील महागणार असल्याचे दिसत आहे.**




भारतातील दोन सर्वात मोठ्या विमान कंपन्या, एअर इंडिया आणि इंडिगो, १ जून २०२६ पासून पुढील तीन महिन्यांसाठी त्यांच्या देशांतर्गत उड्डाणांमध्ये लक्षणीय कपात करण्याची योजना आखत आहेत.

समोर आलेल्या माहितीनुसार, टाटा ग्रुपच्या मालकीची एअर इंडिया आपली देशांतर्गत क्षमता १५% पर्यंत कमी करण्याची योजना आखत आहे, तर बाजारपेठेतील अग्रणी इंडिगो देखील आपल्या उड्डाणांमध्ये ५% ते ७% पर्यंत कपात करू शकते. इराण युद्ध आणि महागडे एव्हिएशन टर्बाइन इंधन (एटीएफ): २८ फेब्रुवारी रोजी इराणवर झालेल्या हल्ल्यांपासून पश्चिम आशियातील तणाव उच्च पातळीवर पोहोचला आहे. या युद्धामुळे एव्हिएशन टर्बाइन इंधनाच्या (एटीएफ) किमतीत मोठी वाढ झाली आहे, ज्यामुळे विमान कंपन्यांचा परिचालन खर्च लक्षणीयरीत्या वाढला आहे.

# केरळच्या माजी मुख्यमंत्र्यांवर ईडीची छापेमारी

वृत्तसंस्था । तिवेंद्रम

**केरळचे माजी मुख्यमंत्री पिनराई विजयन यांच्या घरावर आज (२७ मे) ईडीने छापेमारी केली. एका कथित मनी लाँड्रिंग प्रकरणी ही छापेमारी करण्यात आली. केरळ विधानसभा निवडणुकीत पिनराई विजयन यांच्या नेतृत्वात लढलेल्या लेफ्ट डेमोक्रेटिक फ्रंटचा (एलडीएफ) पराभव झाला. त्यानंतर विजयन यांच्यावर त्यांच्या व एलडीएफ मधील मित्रपक्षांनी जोरदार टीका केली.**

त्यामुळे विजयन हे राजकारणापासून दूर गेले होते. परंतु, ईडीने केलेल्या छापेमारीमुळे केरळच्या राजकारणात विजयन पुन्हा एकदा केंद्रस्थानी आले आहेत. बुधवारी सकाळी विजयन यांच्या घरावर ईडीने छापा टाकताच विजयन यांच्या समर्थनात काही वरिष्ठ नेते धावून आले. त्यांनी विजयन यांना पाठिंबा दिला. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या (माकप) कार्यकर्त्यांनी रस्त्यावर उतरून आंदोलने केली. भाजपा विरोधात घोषणाबाजी केली. पराभवानंतर माकपचे सोशल मीडिया अकाऊंट निष्क्रिय झाले होते. ईडीच्या छापेमारीनंतर तेही सक्रिय झाले. ईडीच्या छापेमारीमुळे विजयन यांना पुन्हा एकदा राजकीय 'लाइफलाइन' मिळाल्याचे दिसले. पराभव झाल्यानंतर पिनराई विजयन हे त्यांच्याच पक्षात एकटे पडले होते. माकपमधील त्यांचे महत्त्व कमी झाले होते. विजयन यांच्यामुळेच एलडीएफचा पराभव झाला, असे मानणारा एक गट माकपमध्ये होता. माकपमधील सामान्य कार्यकर्त्यांपासून ते नेत्यांपर्यंत सर्वांनीच विजयन यांना पराभवासाठी कारणीभूत ठरवले होते. त्यांच्या विरोधात माकपमधूनच आवाज उठवला जात होता.

ईडीने केरळची राजधानी तिरुवनंतपुरम मधील व विजयन यांच्या कन्नूर येथील पिनराई या गावातील निवासस्थानी छापेमारी केली. तसेच त्यांची मुलगी विना हिच्या आयटी फर्मशी संबंधित बंगळुरूमधील ठिकाणांवर छापा टाकण्यात आला. जावई मोहम्मद रियाज यांच्या कोझिकोड येथील घरावर छापा टाकण्यात आला. विजयन यांच्या मुख्यमंत्री पदाच्या पहिल्या कार्यकाळात कोचिन मिनरल्स अँड रूटाइल लिमिटेडने बेकायदेशीपणे विना यांच्या आयटी फर्म 'एक्झालॉजिक'ला पैसे दिल्याचा आरोप आहे. याच प्रकरणात ही छापेमारी करण्यात आली. ईडीने विजयन यांच्या मुलीशी संबंधित प्रकरणी विजयन यांच्यावर छापेमारी करून एकप्रकारे माकपवर हल्ला केला आहे, असे ठसवण्याचा प्रयत्न माकपकडून करण्यात आला. जर ईडीने फक्त विजयन यांच्या मुलीच्या ठिकाणांवर छापा टाकला असता, तर हे प्रकरण कुटुंबापुरते मर्यादित राहिले असते.

# बोगस शालार्थ आयडी घोटाळा निर्णायक वळणावर

## नाशिकमधील उद्याच्या अंतिम सुनावणीकडे शिक्षण विभागाचे लक्ष लागून

प्रतिनिधी । जळगाव

**नाशिक विभागातील बोगस शालार्थ आयडी घोटाळा प्रकरणाने आता निर्णायक टप्पा गाठला असून, त्यासंदर्भात अंतिम सुनावणी शुक्रवारी २९ मे रोजी नाशिक विभागीय शिक्षण मंडळाच्या कार्यालयात होणार असल्याचे सांगितले जात आहे. या सुनावणीकडे जळगाव जिल्ह्यातीलही शेकडो शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, मुख्याध्यापक आणि संस्थाचालकांचे लक्ष लागले आहे. अनेकांच्या नोकऱ्या आणि भवितव्यावर या निर्णयाचा थेट परिणाम होणार असल्याने शिक्षण क्षेत्रात प्रचंड अस्वस्थता निर्माण झाली आहे.**




नाशिक विभागातील खासगी प्राथमिक आणि माध्यमिक शाळांमधील तब्बल ८९२ कर्मचाऱ्यांचे शालार्थ आयडी शासकीय नोंदीतील जावक क्रमांकांशी जुळत नसल्याचे चौकशीत उघड झाले होते. या प्रकारामुळे शालार्थ प्रणालीतील पारदर्शकता, मान्यता प्रक्रिया आणि शिक्षण विभागाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले. संबंधित कर्मचाऱ्यांना मिळालेल्या वैयक्तिक मान्यता आणि शालार्थ आयडी प्रक्रियेत अनियमितता झाल्याचा संशय व्यक्त करण्यात आला. त्याअनुषंगाने या संपूर्ण प्रकरणाची विभागीय स्तरावर चौकशी गेल्या काही महिन्यांपासून सुरू आहे. जळगाव जिल्ह्यातीलही काही शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची यापूर्वी दोन वेळा सुनावणी घेण्यात आली होती. मात्र, अद्याप कोणताही अंतिम निष्कर्ष किंवा ठोस कारवाईचे पाऊल उचलण्यात आलेले नाही.

त्यामुळे संबंधित कर्मचारी आणि संस्था चालकांमध्ये संभ्रम आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. तशात आता तिसऱ्यांदा होणारी ही अंतिम सुनावणी अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. त्यानंतर प्रशासनाकडून कठोर निर्णय घेतले जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. शुक्रवारी सकाळी ११ वाजेपासून नाशिक येथील विभागीय शिक्षण मंडळ कार्यालयात सुनावणीची प्रक्रिया सुरू होणार आहे. या सुनावणीसाठी जळगावसह नाशिक विभागातील विविध जिल्ह्यांमधून शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, आजी-माजी मुख्याध्यापक, संस्थाचालक तसेच शिक्षण विभागातील अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. दरम्यान, एका कर्मचाऱ्याच्या प्रकरणात अनेक (पान २ वर)

# काश्यपी धरणात बुडून चौघांचा मृत्यू

वृत्तसंस्था । नाशिक

**जिल्ह्यात पिकनिकसाठी गेलेले एक दाम्पत्य आणि दोन किशोरवयीन मुलांचा काश्यपी धरणात बुडून मृत्यू झाला आहे. ही घटना मंगळवारी संध्याकाळी घडली.**

पोलिसांच्या माहितीनुसार, मखमलाबाद येथील रहिवासी सचिन कैलास ठोंबरे (वय ३०) आणि त्यांची पत्नी रोहिणी (वय २५) हे आपल्या दोन वर्षांच्या मुलीसह आणि शेजारी राहणाऱ्या दोन मुलांसोबत, केतन अनिल पवार (१६ वय ) आणि कौशल अनिल पवार ( वय १४) हे या धरणाच्या जलाशयावर



गेले होते. यात दाम्पत्य आणि दोन किशोरवयीन मुले पाण्यात बुडाली. संगीता घाडगे नावाची एक महिला तिथून जात असताना तिला लहान मुलगी जलाशयाच्या दिशेने जाताना दिसली. तिने तात्काळ घटनास्थळी धाव घेतली आणि त्या मुलीला (पान २ वर)

## संपादकीय

### संतुलन साधावे लागेल !

इराणशी शांतताचर्चा सुरू असताना अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अचानक पोतडीतून अब्राहम कराराचे पिल्लू बाहेर काढल्याने अरब देशांसह युद्धविरामासाठी मध्यस्थी करणाऱ्या पाकिस्तानातही खळबळ माजणे साहजिक आहे. पश्चिम आशियात शांतता-साहचर्य नांदावे, असा या कराराचा तोंडवळा असला, तरी त्यामागून इस्रायलला अरब देशांमध्ये चंचुप्रवेश मिळवून देण्याचा आणि वर्षानुवर्षे त्यांच्या अस्मितेचा मुद्दा असलेल्या पॅलेस्टाइनच्या विषयाला सोडचिठ्ठी द्यायला लावण्याचा हा अमेरिका-इस्रायलचा सापळा आहे. याला अनुकूलता दर्शवण्याचा प्रयत्न केला, तरी अत्यंत संवेदनशील धार्मिक भावना आणि जनमताच्या विरोधाचा स्फोट होऊ शकतो, या भीतीने सौदीसह बहुसंख्य देशांनी त्याला विरोध केला आहे; पाकिस्तानने तर अमेरिकेचा दबाव असतानाही तसा प्रश्नच उद्भवत नाही, असे सांगून लगोलग ही कल्पनाच साफ फेटाळून लावली आहे. जगभरातील अस्वस्थतेचे एक केंद्र असलेल्या अरब आणि इस्रायल यांच्यात शांतता प्रस्थापित करण्याचे अनेक प्रयत्न झाले. पहिल्या कार्यकाळात ट्रम्प यांनी मुस्लिम, ज्यू आणि ख्रिश्चन धर्मीयांचेही श्रद्धास्थान असलेल्या अब्राहम यांच्या नावाने मांडलेला हा प्रस्ताव, हे त्याच दिशेने टाकलेले एक पाऊल. वर्षानुवर्षांचा पॅलेस्टाइनचा प्रश्न बाजूला ठेवून इस्रायलशी अन्य विषयांवर सहकार्याचा मार्ग खुला करणे, हा या कराराचा गाभा. गेल्या सहा वर्षांत संयुक्त अरब अमिराती (यूएई), बहारीन, मोरोक्को आणि सुदान हे त्यामध्ये सहभागी झाले आणि व्यापार, पर्यटन व तंत्रज्ञान अशा विविध क्षेत्रांत इस्रायलचे सहकार्य आणि अमेरिकेची मेहेरनजर असे लाभही त्यांच्या पदरी पडले. इराणसोबतच्या चर्चेची म्हैस पाण्याबाहेर येत नसताना अमेरिकेतील ज्यू लॉबीला आणि रिपब्लिकन पक्षातील असंतुष्टांना खूश करणे, हा अंतर्गत उद्देशही त्यामागे दिसतो. अलीकडे अरब राष्ट्रांमध्ये इराणचा दबदबा वाढत असताना सुन्नीबहुल अरब देशांचे इस्रायलशी सूत जुळवून शियाबहुत इराणला एकटे पाडण्याचा आणि चीन-रशिया व इराण या त्रिकुटालाही शह देण्याचा हा डाव मानला जातो. या कराराद्वारे, इस्रायली दूतावास, विमानसेवा सुरू करणे, व्यापार-पर्यटनास चालना आणि तंत्रज्ञान व संरक्षणविषयक सहकार्याचे मार्ग या देशांसाठी खुले होऊ शकतात. मात्र, त्यांच्या दृष्टीने इस्रायल आजवर अस्पृश्यच आहे. पाकिस्तानात तर महंमद अली जीना यांच्या काळापासूनच इस्रायलला मान्यता नाही. सन १९६७च्या सीमारेषेला मान्यता, पॅलेस्टाइन राष्ट्राची स्थापना आणि पूर्व जेरुसलेम ही त्याची राजधानी यांना मान्यता दिल्याशिवाय इस्रायलशी संबंधांचा विचारही करता येणार नाही, अशी यापैकी अनेकांची भूमिका आहे. या करारामुळे धूर्त इस्रायल अरब जगतात केंद्रस्थानी येऊन अप्रत्यक्ष त्यांच्यावर नियंत्रणही गाजवील, अशी भीतीही अनेक देशांना आहे. त्यामुळेच एकीकडे अमेरिकेकडून मिळणारे फायदे यांचा एक दबाव आहे; तर दुसरीकडे मुस्लिम जगतामध्ये पॅलेस्टिनींबाबतच्या भावना अत्यंत संवेदनशील आहेत. अलीकडच्या गाझा युद्धामुळे त्यांचा इस्रायलविरोध आणखी तीव्र झाला आहे. गेल्या काही काळात अमेरिकेशी अत्यंत लाडीगोडी करणाऱ्या पाकिस्तानी नेत्यांची ट्रम्प यांच्या प्रस्तावाने चांगलीच पंचाईत झाली आहे. भारतासाठी इस्रायल, सौदी आणि यूएईसह अनेकांचे सहकार्य आणि तेलपुरवठ्याद्वारे ऊर्जा सुरक्षेच्या दृष्टीने असा करार फायदेशीर आहेच. मात्र, चाबहार बंदर आणि इराणशी जुनी भागीदारी अशा अनेक विषयांचा विचार करून योग्य संतुलन साधावे लागेल.

# कर्ज घेण्यावरुन राष्ट्रवादी-सेनेचा सभात्याग

## भाजपा नगरसेवक संतप्त;अमृत २ योजनेसाठी दीडशे कोटी रुपयांच्या कर्जाला महासभेत हिरवा कंदील

प्रतिनिधी । धुळे

**अमृत २ योजनेला आमचा विरोध नाही. आमचा विरोध योजनेसाठी कर्ज घेण्याला आहे, अशी भुमीका मांडत राष्ट्रवादी-सेनेच्या आघाडीचे नेते शाहबाज शाह यांनी सभात्याग करीत असल्याचे सांगताच भाजपा नगरसेवक संतप्त झाले. रणछोडदास, भगोडे अशी टीका राष्ट्रवादी-सेनेच्या सभात्याग करणाऱ्या नगरसेवकांवर करत या नगरसेवकांच्या प्रभागांमध्ये ही योजना राबवू नका, अशी भूमिका भाजपाच्या नगरसेवकांनी मांडली.**





दीडशे कोटी रुपयांचे कर्ज अमृत २ योजनेच्या ३० टक्के हिस्स्यासाठी घेणे हितावह आहे. स्थायी समितीच्या चार सदस्यांच्या पत्रानुसार केंद्र शासन पुरस्कृत अमृत २ योजनेंतर्गत धुळे शहर मलनिस्सारण योजनेच्या मनपा हिस्स्याची ३० टक्के रक्कम कर्ज स्वरुपात मिळण्याबाबतच्या विषयावर आज महापालिकेच्या भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृहात विशेष महासभा घेण्यात आली. यासभेत राष्ट्रवादी सेनेच्या सदस्यांनी कर्ज घेण्याच्या विषयाला विरोध केला. तर विरोधी बाकावर बसलेल्या एमआयएमने मात्र विकासासाठी आम्ही प्रशासनासोबत आहोत, मात्र जनतेवर बोजा पडू नये अशी अपेक्षा व्यक्त केली.

**कर्जाचा नव्हे तर विकासाचा डोंगर : मासुळे**

अमृत २ योजनेच्या हिस्स्यासाठी १५० कोटी रुपयांच्या कर्ज घेण्याच्या भुमीकेला अमोल मासुळे यांनी जोरदार समर्थन दिले. १५० कोटींच्या कर्ज प्रकरणामुळे कर्जाचा नव्हेतर विकासाचा डोंगर उभा राहील. विरोधक हे बालीश आहेत. आमच्या लोकांना भडकविण्याचा उद्योग बालिश विरोधक करीत आहेत. परंतु आमचे सदस्य हुशार आहेत. त्यांनी अशा बालिश प्रकाराला भीक घातली नाही. दीडशे कोटीच्या कर्जाला संमती दिली तर नगरसेवकांवर रिकव्हरी निघेल. अशी भिती घालण्याचा प्रयत्न झाला. परंतु आपण तापी योजनेसाठी देखील कर्ज घेतले होते. त्याची किती रिकव्हरी निघाली असा मुद्दा मांडत त्यांनी विरोधकांचा दावा खोडून काढला.

### नगरसेवकांना रिकव्हरी लागणार नाही: आयुक्त

मनपाच्या ३० टक्के हिस्स्यासाठी दीडशे कोटींच्या कर्ज प्रकरणावर प्रशासनाची भुमीका मांडताना आयुक्त नितीन कापडणीस म्हणाले की, या कर्जप्रकरणावरून सभागृहातील सदस्यांवर रिकव्हरी लागणार नाही. एका योजनेचे पैसे दुसऱ्या योजनेकडे वळते केले. अनियमितता झाली तर त्याला प्रशासन जबाबदार राहील. आयुक्तांना अधिकार हा कुठलाही जुमला नाही. जशी दृष्टी, तशी सृष्टी असे म्हणत आयुक्तांनी राष्ट्रवादी-सेनेला टोला लगावला. मला कुठलेही अधिकार नाही, केवळ काही तांत्रिक बाबी आणि किरकोळ दुरुस्तीचे अधिकार कर्ज प्रकरणात देण्यात आले आहे. राष्ट्रवादी सेनेने अर्धवट माहितीच्या आधारे सभात्याग केला आहे. मनपाला खड्ड्यात घालण्यासाठी आपण लोन घेतलेले नाही. उत्पन्नांचे साधणं कमी असल्याने कर्ज घ्यावे लागणार आहे. आपले इन्कम सोर्स कमी आहे. ते वाढविण्यासाठी प्रयत्न करीत आहोत, मनपाने स्वहिस्सा भरल्याशिवाय योजना शासन मान्य करत नाही. म्हणून आपण कर्ज घेतो. आपल्याला मिळणाऱ्या जीएसटीच्या अनुदानात वाढ झाली तर कर्जाची गरजही पडणार नाही. अमृत २ योजनेमुळे धुळेकरांची डास, मच्छर, उघड्या गटारींपासून सुटका होईल,असे आयुक्त नितीन कापडणीस यांनी सांगितले.

### नगरसेवक अभ्यासू: महापौर

अमृत २ योजना ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री ना. जयकुमार रावल, ना. गिरीश महाजन आ. अनुप अग्रवाल, माजी मंत्री डॉ. सुभाष भामरे, आ. अमरिशभाई पटेल, भाजप जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर यांच्या प्रयत्नातून मिळाली असल्याचे महापौर मायादेवी परदेशी यांनी सांगितले. काल ठाकरेंच्या सेनेचे पदाधिकारी मला निवेदन द्यायला आले होते. त्यांनी ५ ते १० मिनिटं माझ्याशी चर्चा केली. आयुक्तांना विषय माहित आहे का? अशी विचारणा केली. नगरसेवकांनी अजेंडा वाचला आहे का? असा सवालही त्यांनी केला होता. मात्र आमचे नगरसेवक अभ्यासू आहेत, त्यांना विकासाची जाण आहे. ठाकरे सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी काढता पाय घेतला. अमृत २ योजनेसाठी कर्ज घेणे आवश्यक आहे. आपण दीडशे कोटींचे कर्ज एक रक्कमी घेणार नाहीत. ज्या प्रमाणात कर्ज लागेल त्या प्रमाणात ते घेवू. या कर्जाचे हप्ते मनोरंजन कर, जीएसटी मधून वळते होतील,असे महापौरांनी सांगितले.

# नंदुरबार वैद्यकीय महाविद्यालयाच्या कामांना गती द्या!

प्रतिनिधी । नंदुरबार

**नंदुरबार येथे उभारण्यात येत असलेल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व संलग्न रुग्णालयाच्या कामांचा आढावा वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी मंत्रालयात आयोजित बैठकीत घेतला. यावेळी बांधकामाची सद्यस्थिती, निधी, पाणी व वीजपुरवठा तसेच प्रलंबित कामांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.**



या बैठकीस वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाचे सचिव धीरज कुमार, संबंधित अधिकारी तसेच नंदुरबार जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. संजय राठोड दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते. मंत्री हसन मुश्रीफ म्हणाले की, नंदुरबारसारख्या आदिवासी व दुर्गम जिल्ह्यात अत्याधुनिक वैद्यकीय शिक्षण व दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध आहे. वैद्यकीय महाविद्यालयाच्या कामांना आवश्यक गती देत प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करावे. महाविद्यालयाच्या कामांसाठी आवश्यक रस्ते, वीज व पाणीपुरवठा या मूलभूत सुविधांची पूर्तता करण्यासाठी जिल्हाधिकारी, अधिष्ठाता आणि संबंधित विभागांनी विशेष लक्ष द्यावे. प्रलंबित कामे तातडीने मार्गी लावून नागरिकांना लवकरात लवकर आरोग्य सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, असे निर्देशही त्यांनी दिले. कामांच्या गुणवत्तेबाबत कोणतीही तडजोड होऊ देऊ नये, निधी वितरण व प्रशासकीय मंजुरीची प्रक्रिया गतिमान करावी, असे सांगतानाच अलिबाग, वाशिम, अमरावती, गडचिरोली, धाराशिव, रत्नागिरी, पालघर आणि अंबरनाथ येथील वैद्यकीय महाविद्यालयांच्या कामांचाही बैठकीत आढावा घेण्यात आल्याची माहिती मंत्री मुश्रीफ यांनी दिली.

# मान्सूनपूर्व नालेसफाई मोहिमेला वेग

प्रतिनिधी । नवापूर

**मान्सून आगमनापूर्वी शहरात पाणी तुंबण्याच्या समस्या टाळण्यासाठी नवापूर नगरपालिकेकडून नाला सफाई मोहिमेला वेग देण्यात आला आहे.**

शहरातील नेशनल हायवे क्रमांक ६ ते ईदगाह मशिदीपर्यंतच्या मुख्य नाल्याची साफसफाई जेसीबीच्या सहाय्याने सुरू करण्यात आली असून या कामामुळे नाल्यालगत राहणाऱ्या नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. या नाला सफाई मोहिमेची सुरुवात राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे शहराध्यक्ष मनोहर नगराळे, पाणीपुरवठा सभापती शरद पाटील, नगर-सेवक अल्तमस खाटीक, अमृत लोहार आणि जयेश जयस्वाल, भाविन आतारकर यांच्या उपस्थितीत करण्यात आली. पदाधिकाऱ्यांनी स्वतः घटनास्थळी उपस्थित राहून कामाची पाहणी केली. तसेच काम दर्जेदार व वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना संबंधित कर्मचाऱ्यांना दिल्या. दरवषी पावसाळ्यात नाल्यांमध्ये गाळ आणि कचरा साचल्याने पाणी तुंबून नाल्यालगत राहणाच्या नागरिकांच्या घरांमध्ये पाणी शिरते. ही गंभीर समस्या लक्षात घेऊन राष्ट्रवादीचे नेते भरत गावीत, नगराध्यक्ष जयवंत जाधव, उपनगराध्यक्ष नरेंद्र नगराळे यांनी विशेष बैठक घेत शहरातील सर्व नाल्यांची तातडीने साफसफाई करण्याचा निर्णय घेतला.

## पान १ वरुन

**बोगस शालार्थ आयडी......**

संबंधितांना उपस्थित राहावे लागत असल्याने सुनावणी प्रक्रिया अधिक वेळखाऊ ठरत असल्याची तक्रार आहे. कारण, प्रत्येक सुनावणीवेळी संबंधितांना तीन ते चार दिवस नाशिकमध्ये मुक्काम करावा लागत असल्याने आर्थिक भार वाढतो. प्रवास, निवास आणि इतर खर्चामुळे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त ताण येत असल्याचे समोर आले आहे. यासोबतच शाळांचे दैनंदिन कामकाजही विस्कळीत होत असल्याने शिक्षण क्षेत्रातून नाराजी व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर, जळगाव जिल्हा माध्यमिक शिक्षक-शिक्षकेतर संघटना समन्वय समितीचे समन्वयक तुळशीराम सोनवणे यांनी सर्व सुनावण्या जिल्हास्तरावरच घेण्याची मागणी केली आहे. संबंधितांना वारंवार नाशिकला जावे लागत असल्याने वेळ आणि पैशाचा मोठ्या प्रमाणावर अपव्यय होत असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच आतापर्यंत अनेक सुनावण्या होऊनही अंतिम निर्णय होत नसल्यामुळे संबंधित कर्मचारी मानसिक तणावाखाली असल्याकडेही त्यांनी लक्ष वेधले. अंतिम सुनावणीनंतर दोषींवर कारवाई होणार का, संबंधित कर्मचाऱ्यांच्या सेवा अबाधित राहणार का आणि प्रशासन या संपूर्ण प्रकरणात कोणती भूमिका घेणार, याकडे आता संपूर्ण शिक्षण क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

**पंतप्रधान नरेंद्र मोदी......**

ही विरोधी पक्ष, शेतकरी आणि जनतेची ताकद असल्याचे सपकाळ म्हणाले. कालच्या चमत्कारामुळेच त्यांना दिल्लीत नमस्कार घालावा लागत आहे, पण, दिल्लीतून हात रिकामा घेऊन माघारी घेऊ नका, असा सज्जड दम सपकाळ यांनी दिला. मी कोणताही चुकीचा शब्द वापरलेला नाही. दलिंदर हा लक्षण दर्शवणारा शब्द आहे. दारिद्र्य या संस्कृत शब्द बोली भाषेत दलिंदर होतो. मोदी सत्तेत आल्यापासून शेतकऱ्यांना भाव नाही, बेरोजगारी वाढली आहे. महिलांवरील आत्याचार वाढले आहेत, भ्रष्टाचार बोकाळला आहे त्या अर्थाने त्या शब्दाचा वापर केला, असे स्पष्टीकरण सपकाळ यांनी दिले. तसेच, संस्कृतमधील शब्द भाजपाला खटकला असेल तर, नरेंद्र मोदी हे पनौती आहेत, असा पुनरुच्चार मी करतो, अशी टीका सपकाळांनी केली.

राज्यातील वारकऱ्यांना मतदार यादीतून वगळण्याचा प्रयत्न होऊ नये, यासाठी राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी श्री. चोकलिंगम यांना पत्र पाठवून विशेष सखोल पुर्नरिक्षण मोहिमेचा दुसरा टप्पा महिनाभर पुढे ढकलण्याची मागणी केली.

**नाशिकच्या काश्यपी धरणात......**

वाचवले. पाण्याच्या दिशेने बोट दाखवत ती मुलगी सतत मम्मी, पप्पा असे रडत होती. धरणाच्या काठावर चपलांच्या जोड्या पडलेल्या दिसल्यानंतर घाडगे यांनी स्थानिक रहिवाशांना सावध केले, त्यानंतर स्थानिकांनी ठोंबरे दाम्पत्य आणि त्या दोन मुलांचे मृतदेह पाण्यातून बाहेर काढले. रोहिणीच्या मोबाईल फोनवर आलेला एक कॉल उचलल्यानंतर मृतांची ओळख पटली. नंतर अधिकाऱ्यांना असे आढळून आले की, रोहिणी गर्भवती होती. हर्सूल पोलीस ठाण्यात अपघाती मृत्यूची नोंद करण्यात आली असून, पुढील तपास सुरू आहे.

**रेल्वे स्थानकातील खाद्यपदार्थांच्या......**

देण्यात आली होती. नवीन दरांनुसार प्रवाशांना आता फलाटावरील खाद्यपदार्थांसाठी अधिक पैसे मोजावे लागणार होते. विशेषतः वडापाव, समोसा, सँडविच, डोसा, पावभाजी यासारख्या लोकप्रिय पदार्थांच्या दरात मोठी वाढ करण्याचे नियोजन होते. सध्या १३ रुपयांना मिळणारा वडा पाव २० रुपयांवर पोहोचणार होता. तर, समोशाचा दरही १२ रुपयांवरून २० रुपये करण्यात आला होता. दरम्यान, कचोरी, गुलाबजाम, ताजा ज्यूस, मिसळ पाव, व्हेज नूडल्स यांसह १६ पदार्थांच्या दरात कोणताही बदल न करण्याचे प्रस्तावित होते. तसेच सरबत आणि सोडा उत्पादनांचे दरही ङ्कजैसे थेफ ठेवण्याचे नियोजन होते. परंतु, प्रवासी आणि प्रवासी संघटनांनी या दरपत्रकाला विरोध दर्शविला. त्यानंतर रेल्वे स्थानकावरील खाद्यपदार्थ्यांच्या दरात वाढ करण्याचे परिपत्रक मागे घेण्यात आले. १ जूनपासून लागू होणाऱ्या दरपत्रकातील सुधारणा, पुढील सूचना मिळेपर्यंत स्थगित करण्यात आली आहे. दरवाढीसोबत खाद्यपदार्थांच्या गुणवत्तेतही सुधारणा झाली पाहिजे. सर्व परवानाधारकांनी आपल्या केटरिंग युनिट्समध्ये नवीन दरपत्रक द्विभाषिक स्वरूपात ठळकपणे प्रदर्शित करणे बंधनकारक करणे. नवीन दर लागू झाल्यानंतर सहा महिन्यांनी विक्रीचे मूल्यांकन करून परवाना शुल्काचा आढावा घेण्याचे निर्देश विभागांना देण्यात आले होते.

# दिव्यांग बांधवांची आरोग्य तपासणी

**नंदुरबार ।** जिल्ह्यातील दिव्यांग बांधवांची आरोग्य तपासणी करून आवश्यक सहाय्यक साहित्य मोफत करून देण्यासाठी तालुकानिहाय विशेष शिबिरांचे आयोजन केले आहे. तालुकानिहाय शिबिरांचे वेळापत्रक दि.३० ते ३१ मे रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत, एस.ए.मिशन हायस्कूल हॉल नंदुरबार, तळोदा दि.२ व ३ जून रोजी सकाळी ११ ते सायं. ५.३० वाजेपर्यंत श्री. जैन मंदिर, गणपती रोड, तळोदा. नवापूर - दि.५ व ६ जून रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत, अग्रवाल समाज मंदिर, विसरवाडी रोड, नवापूर. व नगरपालिका टाऊन हॉल नवापूर. अक्कलकुवा- ८ व ९ जून रोजी सकाळी ११ ते सायं.५.३० वाजेपर्यंत, जैन मंदिर अक्कलकुवा येथे होणार आहे.

# जैन समाजातील महासतींच्या घटनेचा शहादा जैन श्री संघातर्फे निषेध

प्रतिनिधी । शहादा

**समाजासाठी जैन अत्यंत वेदनादायी व संतापजनक ठरलेल्या घटनेच्या निषेधार्थ शहादा येथे सकल जैन श्री संघाच्यावतीने उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन दिले.**




समाधी सम्राट आचार्य श्री विद्यासागर महाराज यांच्या सुयोग्य शिष्या तसेच आचार्य श्री समयसागर महाराज यांच्या आज्ञेनुवर्ती परम पूज्य श्रुतमति माताजी व परम पूज्य उपशममति माताजी या पायी विहार करत असताना वाहन चालकाने अंगावर वाहन घालून चिरडल्याची अत्यंत दुर्दैवी घटना घडली. या भीषण अपघातात दोन्ही महासतीजींचे निधन झाल्याने जैन समाजात तीव्र संतापाची लाट उसळली आहे. या घटनेतील दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी तसेच जैन संतांच्या सुरक्षेसाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी शहाद्याचे तहसीलदार संभाजी पाटील यांना निवेदनाद्वारे करण्यात आली.

यावेळी सकल जैन संघाचे अध्यक्ष डॉ. कांतीलाल टाटिया, उपनगराध्यक्षा माधवी पाटील, चतुर्वीद संघांचे प्रमुख अध्यक्ष अॅड. प्रदीप टाटिया, कैलास संचेती, फुलचंद लोढा, विजय चोपडा, जेष्ठ मदनलाल लुंकड, विनयचंद्र गांधी, पारसमल कुचेरिया, पापाशेट नाहटा, नगरसेवक ललित छाजेड, भरत ओस्तवाल, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक मोतीलाल जैन, भवरलाल जैन, मनोज बाफना, कचरूलाल नाहटा, प्रदीप देसर्डा बबलू संचेती, समीर टाटीया, सुनील कोटडिया, गुड्डू नहाटा, जैन तीर्थंकर लेणी येथील पवन जैन, निर्मल जैन, राजू ललवाणी, मयूर चोरडिया, जैन समाजातील सर्व नवयुवक समता युवा संघ मूर्तिपूजक युवा संघ, तेरापंती युवक परिषदेचे कार्यकर्ते उपस्थित होते. शहादा शहर व परिसरातील जैन बांधवांनी मोठ्या संख्येने उपविभागीय अधिकारी कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ एकत्र येत संत सुरक्षा व धर्मसंरक्षणासाठी एकजुटीचा संदेश दिला. जैन एकता संत सुरक्षा, धर्मसंरक्षणासाठी एकजूट आवश्यक आहे, अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता.

# माजी आ. कुणाल पाटील यांनी दिला निराधारांना आधार!

प्रतिनिधी । धुळे

**संजय गांधी निराधार योजनेंतर्गत विविध योजना तसेच वैयक्तीक लाभाच्या योजनेसाठी धुळे ग्रामीणचे माजी आ. कुणाल पाटील यांनी धुळे तालुक्यातील पात्र लाभार्थ्यांना हयातीचा दाखला देण्याची मोफत सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून कुणाल पाटील यांनी निराधारांना आधार दिल्याने तालुक्यातील लाभार्थ्यांकडून समाधान व्यक्त केले आहे.**



शासनाच्यावतीने संजय गांधी योजना तसेच इतर वैयक्तीक लाभाच्या योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना हयातीचा दाखला बंधनकारक केला आहे. त्यासाठी माजी आ. कुणाल पाटील यांनी त्यांच्या धुळे शहरातील संपर्क कार्यालयात हयातीचा दाखला मोफत तयार करुन देण्याची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. त्यांच्या या उपक्रमाला धुळे तालुक्यातील लाभार्थ्यांकडून प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्ती वेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग निवृत्ती वेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्ती वेतन योजना यांच्यासह वैयक्तीक लाभाच्या अनुदान योजनेसाठी पात्र लाभार्थ्यांचा हयातीचा दाखला संबधित विभागाला दरवर्षी द्यावा लागतो. सदर दाखला काढण्यासाठी ज्येष्ठ नागरीक, वयोवृध्द नागरीक, दिव्यांग बांधवांना अनेकवेळा कागदपत्रांअभावी फ ेऱ्याही माराव्या लागतात.

### लाभार्थ्यांना हयातीचा दाखला दिला जातो

धुळे ग्रामीणचे माजी आ. कुणाल पाटील यांनी पात्र लाभार्थ्यांना हयातीचा दाखला मोफत वितरणाची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. सोमवार दि.२५ मे पासून कुणाल पाटील यांच्या संपर्क कार्यालय, जिजामाता हायस्कूल शेजारी प्रांत कार्यालयासमोर धुळे येथे हयातीचा दाखला तयार करून दिला जात आहे. या ठिकाणी लाभार्थ्यांना आवश्यक त्या कागदपत्रांसह हयातीचा दाखला बनवून दिला जात आहे. हयातीचा दाखला मोफत आणि सहज उपलब्ध होत असल्याने लाभार्थ्यांनी समाधान व्यक्त केले आहे.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक - सागर काशिनाथ ओतारी **(मोबा.- ९९७००५३०६६)** व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
✻ **कार्यकारी संपादक - किशोर शंकर शिंपी** (✻ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७-२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

## दिन विशेष...

१९५१ : मुंबईतील प्रसिध्द तारापोरवाला मत्स्यालयाचे राष्ट्रपती बाबू राजेंद्र प्रसाद यांच्या हस्ते उद्घाटन.
१९६४ : स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान व मुलांचे आवडते चाचा नेहरू यांचे निधन.
१९९४ : संस्कृतचे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे गाढे विद्वान तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे निधन.

## थोडक्यात

### जून महिन्यातील जिल्हास्तरीय लोकशाही दिन रद्द

**जळगाव ।** महाराष्ट्र विधान परिषदेच्या १६ स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या निवडणुकीची अधिसूचना २५ मे २०२६ रोजी प्रसिद्ध झालेली असून निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत म्हणजेच २५ जून २०२६ पर्यंत आचारसंहिता लागू करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने जिल्हास्तरावरील माहे जून-२०२६ मधील पहिला सोमवार दि. ०१ जून २०२६ रोजी आयोजित करण्यात येणारा जिल्हास्तरीय लोकशाही दिन आयोजित करण्यात येणार नसल्याचे प्रशासनाने प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

### २७९ गुंतवणूकदारांची कोट्यवधींची फसवणूक

**जळगाव ।** गुंतवणुकीवर जास्त परताव्याचे आमिष दाखवून २७९ जणांची तब्बल २३ कोटी ८१ लाख ७२ हजार ५३० रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी टीडब्ल्यूजे असोसिएट्स कंपनीचे मुख्य संचालक समीर सुभाष नार्वेकर आणि नेहा समीर नार्वेकर (दोघे रा. गिमवी, ता. गुहागर, जि. रत्नागिरी) यांना जळगाव आर्थिक गुन्हे शाखेने अटक केली आहे. न्यायालयाच्या आदेशानंतर दोघांना ठाणे कारागृहातून ताब्यात घेण्यात आले. या प्रकरणात आधीच अटक करण्यात आलेला मुख्य एजंट मिलिंद शालिकराव पाटील (वय ४१, रा. शिवकॉलनी, जळगाव) हा सध्या न्यायालयीन कोठडीत आहे. त्याच्या चौकशीत कंपनीच्या व्यवहारांबाबत अनेक धक्कादायक माहिती समोर आल्याचे सांगितले जात आहे. पुणे येथील टीडब्ल्यूजे असोसिएट्स कंपनीमार्फत मोठ्या परताव्याचे आश्वासन देत गुंतवणूकदारांकडून पैसे जमा करण्यात आले होते. मात्र ठरलेला परतावा न देता गुंतवणूकदारांची फसवणूक करण्यात आल्याचा आरोप आहे. याप्रकरणी जिल्हापेठ पोलीस ठाण्यात १४ मे रोजी गुन्हा दाखल केला होता.या गुन्ह्यात कंपनीचे मुख्य संचालक समीर नार्वेकर, नेहा नार्वेकर, संकेश रामकृष्ण घाग, एजंट मिलिंद पाटील यांच्याविरोधात कारवाई करण्यात आली आहे. त्यानंतर तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला.सरकार पक्षातर्फे जिल्हा सरकारी वकील सुरेंद्र काबरा यांनी कामकाज पाहिले.

# ...तर शहरातील दुकान थेट सील करणार

**• महापौर दीपमाला काळेंचा इशारा; जळगावात प्लास्टिकविरोधी मोहीम; दुकानदारांना ठोकला दंड**

प्रतिनिधी । जळगाव

**सुरुवातीला प्लास्टिक विक्रेत्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला होता. मात्र गेल्या काही दिवसांपासून शहरात पुन्हा सर्रास प्लास्टिकचा वापर सुरू झाल्याच्या तक्रारी नागरिकांकडून महापौरांकडे येत होत्या. या तक्रारींची गंभीर दखल घेत, महापौर दीपमाला काळे यांनी दि. २६ मे रोजी संध्याकाळी ५ वाजता जळगावच्या मध्यवर्ती बाजारपेठेत अचानक धडक तपासणी मोहीम राबवली.**



या कारवाईमुळे संपूर्ण बाजारपेठेत प्रचंड खळबळ उडाली.दरम्यान, काही दुकानांवर यापूर्वी दोन वेळा कारवाई झाली असून आज त्यांना तिसऱ्यांदा दंड ठोठावण्यात आला. अशा सराईत विक्रेत्यांना महापौरांनी कडक शब्दांत सुनावले. यावेळी जवाहर क्लोथ स्टोअर्स आणि एच.आर.ट्रेडर्स यांना प्रत्येकी दहा हजार असा २० हजारांचा दंड करण्यात आला. यापुढे दुकान थेट सील करणार असल्याचा कडक इशारा महापौर दीपमाला काळे यांनी दिला आहे.

**बाजारपेठेत महापौरांची पायी गस्त**

महापौर दीपमाला काळे यांनी स्वतः शहरातील राजकमल टॉकीज परिसर, तिजोरी गल्ली, अशोक टॉकीज गल्ली, दाणा बाजार, नेताजी सुभाषचंद्र चौक आणि फुले मार्केट परिसर या अत्यंत गजबजलेल्या भागांमध्ये पायी फिरून प्लास्टिक पिशव्यांची पाहणी केली. महापौर अचानक तपासणीसाठी आल्याचे पाहताच फळ विक्रेते,भाजी विक्रेते, छोटे-मोठे दुकानदार आणि हॉकर्सची एकच पळापळ झाली. अनेकांनी आपल्याकडील प्लास्टिक पिशव्यांचे साठे तात्काळ अज्ञात ठिकाणी लपवण्याचा प्रयत्न केला.या धडक मोहिमेदरम्यान काही मोजक्या जागरूक व्यापाऱ्यांकडे पर्यावरणाला पूरक अशा इको-फ्रेंडली शासनाचा अधिकृत शिक्का असलेल्या जाड प्लास्टिक पिशव्या आढळून आल्या. नियम पाळणाऱ्या या व्यापाऱ्यांचे महापौर दीपमाला काळे यांनी कौतुक केले. नागरिकांनी देखील घरून निघताना कापडी पिशव्या सोबत घेऊन निघण्याचे आवाहन यावेळी महापौर काळे यांनी केले. या कारवाईत नगरसेवक रमेश मतानी, आरोग्य विभागाचे मुख्य स्वच्छता निरीक्षक मुकेश पाटील, रुपेश भालेराव, स्वच्छता निरीक्षक महेश ठाकूर, मयूर सपकाळे उपस्थित होते.

**ग्राहकांना वस्तू कशात पॅक करून देता? महापौरांचा संतप्त सवाल**

तपासणीदरम्यान अनेक दुकानांमध्ये मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित प्लास्टिक आढळून आले. महापालिकेच्या आरोग्य विभागाने हे प्लास्टिक जागेवरच जप्त केले, तर नियम मोडणाऱ्या काही दुकानांना मोठा दंड ठोकण्यात आला. कारवाईदरम्यान महापौर चांगल्याच संतापल्या; त्यांनी विक्रेत्यांना तुम्ही फळे आणि इतर वस्तू कशामध्ये पॅक करून ग्राहकांना देतात? असा जाब विचारला, तेव्हा नियमबाह्य प्लास्टिक वापरणाऱ्या विक्रेत्यांकडे बोलायला शब्द नव्हते.

### किरकोळ कारणावरुन तरुणाला जबर मारहाण

**जळगाव ।** शहरातील रेल्वे स्टेशन परिसरात दि. २४ मे रोजी दुपारी दीड वाजेच्या सुमारास काहीही कारण नसतांना अकील उर्फ भुऱ्या शेख अजगर (वय २२, रा. भारत नगर, खडकी चाळ) या तरुणाला काठीने मारहाण करीत गंभीर जखमी केले. याप्रकरणी दोघांविरुद्ध शहर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शहरातील खडकी चाळ परिसरातील भारत नगरात अकील उर्फ भुऱ्या शेख अजगर हा तरुण वास्तव्यास आहे. दि. २४ मे रोजी दुपारी दीड वाजेच्या सुमारास कारण नसतांना संशयित अफताब, हारुण, दिप्या या तिघांनी काठीने अकीलला बेदम मारहाण केली. अकील शेख याने शहर पोलिसात तक्रार दिली. त्यावरुन संशयित तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोहेकॉ पंकज सपकाळे हे करीत आहे.

# दिव्यांग विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण,पटनोंदणी मोहीम सुरु

प्रतिनिधी । पाचोरा

**येथील पंचायत समिती शिक्षण विभाग पाचोरा मार्फत पाचोरा तालुक्यातील दिव्यांग विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण व पटनोंदणी करण्याची कार्यवाही नुकतीच सुरु करण्यात आली. लासगाव येथे गटशिक्षणाधिकारी विजय पवार यांनी दिव्यांग विद्यार्थ्याला पुष्पगुच्छ देऊन त्याचा शाळा प्रवेश निश्चित केला.**



यावेळी विशेष शिक्षक घनशाम चौधरी, जयदीप पाटील, सुवर्णा पाटील यांची उपस्थिती होती. गट शिक्षणाधिकारी विजय पवार व शिक्षण विस्तार अधिकारी सरोज गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच सर्व केंद्र प्रमुख यांच्या संनियंत्रणात चौदा विशेष शिक्षक पाचोरा तालुक्यातील दिव्यांग विद्यार्थ्यांची माहिती संकलित करणार आहेत. सदर मोहीम दहा जुलै पर्यंत राहणार असून नवीन शैक्षणिक वर्षात विशेष बालकांना दाखल करणे, त्यांना समग्र शिक्षा मार्फत आवश्यक साहित्य मिळवून देणे, पालकांचे समुपदेशन करणे, विशेष गरजा असलेल्या बालकांना योग्य शैक्षणिक मार्गदर्शन करण्यासाठी सदर सर्वेक्षण उपयुक्त ठरणार असल्याचे पाचोरा शिक्षण विभागाने कळवले आहे.

# माता रमाबाई आंबेडकर स्मारक समितीतर्फे कविता, गझल स्पर्धा

प्रतिनिधी । जळगाव

**माता रमाबाई आंबेडकर शिक्षण व स्मारक समिती जळगावतर्फे भव्य स्वरचित कविता, गझल स्पर्धा आयोजित करण्यात आलेली आहे. शिक्षण महर्षी, समाज भूषण,समाजसेवक दलितमित्र दादासाहेब द. भि तायडे सर यांच्या जयंतीनिमित्त जास्तीत जास्त कवींनी कविता, गझल पाठवाव्यात,असे आवाहन आयोजकांनी केले आहे.**

कविता व गझलचे विषय संस्थेचे संस्थापक दलित मित्र दादासाहेब द. भि तायडे सर यांच्या जीवन कार्यावर आधारित कविता, वाढती महागाई,अंधश्रद्धा, बेरोजगार, कविता ही सामाजिक आशयाची असावी. कविता विडंबन करणारी नसावी. कविता स्वरचित असावी. कविता, गझल जास्तीत जास्त २० ओळीपर्यंत असावी. कविता, गझल पाठविण्याचा अंतिम दि. २९ मेपर्यंत संध्याकाळी ७ वाजेपर्यंत असेल. उत्कृष्ट कविता व गझलची निवड जेष्ठ कवींकडून परीक्षण केले जाईल. प्रथम, द्वितीय, तृतीय व उत्तेजनार्थ नंबर काढले जातील. आकर्षक स्मृतीचिन्ह, सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात येईल. दि.१ जून रोजी घेणाऱ्या कवी संमेलनात आपणास सन्मानित करण्यात येईल. सहभागी कवींना प्रशस्तीपत्र देण्यात येईल. अधिक माहितीसाठी कवी प्रताप इंगळे ८९९९०७३३८७, कवी. डॉ. अशोक पारधे- ९८२२२८७४५५, कवयित्री ज्योती वाघ, कवी मनोहर तेजवानी यांच्याशी संपर्क साधावा,असेआवाहन माजी प्राचार्य श्रीकांत तायडे यांनी केले आहे.

# वेतन विभाग अधिक्षकांचा समता शिक्षक परिषदेमार्फत सत्कार

प्रतिनिधी । जळगाव

**जळगाव जिल्ह्यातील दुसऱ्या टप्प्यातील तीन हजारांपेक्षा जास्त शिक्षकांचा जटिल वेतन प्रश्न वेतन विभाग अधीक्षक तडवी यांनी यशस्वीरित्या मार्गी लावल्याबद्दल महाराष्ट्र राज्य समता शिक्षक परिषदेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.**



एसआयटी चौकशीमध्ये अडकल्याने, संच मान्यतेच्या तक्रारीमुळे तसेच अन्य कारणांनी जिल्ह्यातील तीन हजारांपेक्षा अधिक शिक्षकांचे वेतन पहिल्या टप्प्यात होऊ शकले नव्हते. महाराष्ट्र राज्य समता शिक्षक परिषद व समन्वय समितीच्या माध्यमातून वेतन विभाग अधीक्षक तडवी आणि शिक्षणाधिकारी कल्पना चव्हाण यांच्याशी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांमार्फत चर्चा करण्यात आली होती. शिक्षक आमदार किशोर दराडे यांच्यामार्फत संबंधित अधिकाऱ्यांना वेतनासंदर्भात विचारणा झाली होती. यातून यशस्वीरीत्या मार्ग निघत शिक्षकांच्या वेतनाचा प्रश्न हा निकाली निघालेला आहे. काही शाळांचे चार - चार महिन्याचे रखडलेले वेतन निघालेले आहेत. वेतनासंदर्भात यशस्वी पाठपुरावा केल्याबद्दल तसेच वेतन विभाग अधीक्षक पदाचा कार्यकाल संपल्याबद्दल अधीक्षक तडवी यांचे समता शिक्षक परिषदेच्या वतीने आज अभिनंदन करण्यात आले. सदर प्रसंगी एरंडोल शिक्षण प्रसारक मंडळ एरंडोलचे अध्यक्ष शरदचंद्र काबरा, समता शिक्षक परिषदेचे प्रदेशाध्यक्ष भरत शिरसाठ, प्रदेश उपाध्यक्ष रणजीत सोनवणे, विभागीय अध्यक्ष गणेश बच्छाव, जिल्हाध्यक्ष भैय्यासाहेब सोनवणे, जिल्हा उपाध्यक्ष हेमेंद्र सपकाळे, ताडे विद्यालयाचे लांबोळे, पी.एस.नारखेडे, महात्मा फुले हायस्कूलचे शिक्षक गोपाल चौधरी, संदीप भंगाळे उपस्थित होते.

# बेनेफिशियरी सत्यापन ॲपद्वारे हयात प्रमाणपत्र सादर करण्याची सुविधा

प्रतिनिधी । जळगाव

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत विशेष सहाय्य योजनांतील लाभार्थ्यांना आता बेनेफिशियरी सत्यापन ॲपच्या माध्यमातून डिजिटल हयात प्रमाणपत्र सादर करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे.**

शासन निर्णयानुसार विशेष सहाय्य योजनांतील लाभार्थ्यांनी दरवर्षी १ जानेवारी ते ३१ मार्च या कालावधीत हयात प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. संबंधित आर्थिक वर्षात लाभार्थ्यांनी प्रमाणपत्र सादर केल्यास बंद केलेले अर्थसहाय्य पुन्हा सुरू करण्याची तरतूद शासनाने केली आहे. केंद्र पुरस्कृत योजनांतील लाभार्थ्यांना मोबाईल ॲपच्या माध्यमातून हयात प्रमाणपत्र सादर करता यावे यासाठी ही प्रणाली कार्यान्वित केली आहे. याच धर्तीवर राज्य पुरस्कृत योजनांतील लाभार्थ्यांनाही ऑफलाईन प्रक्रियेऐवजी प्रणालीद्वारे ऑनलाईन हयात प्रमाणपत्र सादर केले जाईल.

# अल्पवयीन मुलीवर अत्याचाराचा प्रयत्न

प्रतिनिधी । अमळनेर

**अल्पवयीन मुलीचे आई, वडील, भाऊ गावाला गेले असतांनाची संधी साधत एकाने तिच्या खाटेवर जाऊन अत्याचाराचा प्रयत्न केल्याची घटना शहरात २५ रोजी घडली. याप्रकरणी शिल्या उर्फ साहिल रफीक शेख याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

याबाबत मिळालेली माहिती अशी की, ७ वीत शिकणाऱ्या एका मुलीचे आई, वडील, भाऊ संगमनेर येथे कामाला गेलेले होते. ती मुलगी आपल्या आजीसोबत राहत होती. २५ रोजी पहाटे शिल्या उर्फ साहिल रफिक शेख याने घरात प्रवेश करून तिच्यावर अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केला. तेव्हढयात तिची आजी घरात आली. आजीने त्याला पकडून चापट मारली. मात्र तो तिला ढकलून घरातून पळून गेला. अल्पवयीन मुलीने स्वतः आजीसोबत पोलीस स्टेशनला जाऊन फिर्याद दिल्यावरून साहिल शेख याच्या विरुद्ध भारतीय न्या संहिता कलम ७४, ७५, ७६ ,३३३ बालकांच्या लैंगिक अप्रधानपासून संरक्षण अधिनियम २०१२ च्या कलम ८ व १२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी त्याला अटक केली आहे.

### ज्येष्ठ नागरिकांसाठी स्मार्टकार्ड बनविण्याचे शिबीर

**जळगाव ।** शाहुनगर येथे दि.२३ ते २६ रोजी स्व.रामचंद्र टेकावडे स्मरणार्थ राज्य परिवहन मंडळाकडुन एस.टी.बस मध्ये अंपग,जेष्ठ नागरिक, महिला यांना दिल्या जाणाऱ्या सवलती साठी लागणारे स्मार्टकार्ड बनविण्याचे शिबिर घेण्यात आले .शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. एकुण ४९ स्मार्ट कार्ड बनविण्यात आले.शिबीर यशस्वी करण्यासाठी नारायण टेकावडे, हितेंद्र टेकावडे, अतुल काळुखे, प्रमोद वाणी, मयुर मुळीक, जितेंद्र टेकावडे, सार्थक टेकावडे आदिनी परिश्रम घेतले.

# जनगणना कर्मचाऱ्यास अडवून दमदाटी; माजी नगरसेवकाविरुद्ध गुन्हा

प्रतिनिधी । अमळनेर

**केंद्र शासनाच्या जनगणना प्रक्रियेत अडथळा निर्माण करत शासकीय कर्मचाऱ्यास दमदाटी केल्याप्रकरणी शहरातील गांधलीपुरा भागातील माजी नगरसेवक सलीम टोपी यांच्याविरोधात अमळनेर पोलीस ठाण्यात एनसीआर दाखल करण्यात आला आहे.**

राष्ट्रीय कर्तव्य बजावत असलेल्या प्रगणकाला थेट हाकलून लावत जनगणना नोंद करू न दिल्याने प्रशासनाने या घटनेची गंभीर दखल घेतली आहे. प्रगणक दिनेश पालवे हे जनगणना कामकाजासाठी गांधलीपुरा भागात गेले होते. त्यावेळी त्यांनी संबंधित घराची माहिती विचारून जनगणना नोंद करण्याचा प्रयत्न केला असता, तू यहां क्यों आया? अशा शब्दांत दमदाटी करण्यात आली. तसेच संबंधित घराचा क्रमांक टाकू दिला नाही व शासकीय कामात थेट अडथळा निर्माण करण्यात आला. या प्रकारामुळे प्रगणक दिनेश पालवे यांनी घडलेली घटना जनगणना नोंदवहीत नमूद केली. त्यानंतर त्यांनी तातडीने मुख्याधिकारी गणेश शिंदे यांना माहिती दिली. प्रशासनाने या घटनेची तात्काळ दखल घेत अमळनेर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

जनगणना हे केंद्र शासनाचे अत्यंत महत्त्वाचे राष्ट्रीय काम असून त्यासाठी नियुक्त प्रगणक व पर्यवेक्षक यांना नागरिकांनी आवश्यक ती माहिती देणे कायद्याने बंधनकारक आहे. नियुक्त प्रगणक दिनेश पालवे हे शनिवारी गांधलीपुरा भागात माहिती संकलनासाठी गेले असता, त्यांना सहकार्य करण्यात आले नाही, तसेच त्यांच्याशी अयोग्य भाषेत बोलल्याची तक्रार प्राप्त झाली आहे. शासकीय व राष्ट्रीय कामात अडथळा निर्माण करणे गंभीर बाब असून प्रशासनाने या घटनेची तात्काळ दखल घेत संबंधितांविरोधात अमळनेर पोलीस ठाण्यात कायदेशीर कारवाईसाठी पत्र दिले आहे. नागरिकांनी जनगणना प्रक्रियेस पूर्ण सहकार्य करावे, तसेच प्रगणक व पर्यवेक्षक यांच्याशी सौजन्याने वागून आवश्यक माहिती उपलब्ध करून द्यावी.


**– गणेश शिंदे,** मुख्याधिकारी, अमळनेर

# मान्सून काळात आपत्ती व्यवस्थापनासाठी सर्व यंत्रणांनी सज्ज राहावे

**• दूरदृश्य प्रणालीद्वारे मान्सूनपूर्व आढावा बैठकीत जिल्हाधिकारी रोहन घुगे यांच्या सूचना**

प्रतिनिधी । जळगाव

**जून महिन्यात सुरु होणाऱ्या मान्सून काळाच्या पार्श्वभूमीवर जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जळगाव तसेच जिल्ह्यातील सर्व विभाग प्रमुखांची आगामी मान्सूनपूर्व व मान्सून काळात विविध पातळीवर करावयाची पूर्वतयारी आणि विभागनिहाय उपाययोजनांचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण जळगाव रोहन घुगे यांच्या अध्यक्षतेखाली आज दूरदृश्य प्रणालीद्वारे मान्सूनपूर्व आढावा बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडली.**



यावेळी प्रभारी निवासी उपजिल्हाधिकारी अर्चना मोरे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी नरवीर रावळ, विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत जिल्ह्यात संभाव्य अतिवृष्टी, पूरस्थिती, वीजपुरवठा खंडित होणे, रस्ते वाहतूक अडथळे, पाणी साचणे तसेच आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने विविध विभागांनी करावयाच्या उपाययोजनांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व विभागांनी परस्पर समन्वय राखून आपत्ती व्यवस्थापनाची यंत्रणा सक्षम ठेवण्याच्या सूचना दिल्या. गाव व शहर पातळीवर पाणी साचणाऱ्या ठिकाणांची ओळख करून आवश्यक उपाययोजना करण्यासह नियंत्रण कक्ष २४७ कार्यरत ठेवण्याबाबत निर्देश देण्यात आले. सार्वजनिक बांधकाम विभाग, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण तसेच संबंधित यंत्रणांनी रस्ते, पूल व नाल्यांची तातडीने पाहणी करून दुरुस्तीची कामे पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले. महावितरण विभागाने वीजवाहिन्यांलगत धोकादायक झाडांच्या फांद्यांची छाटणी करून अखंडित वीजपुरवठ्यासाठी आवश्यक तयारी ठेवावी, अशा सूचना यावेळी देण्यात आल्या. तसेच आरोग्य विभागाने साथीच्या रोगांच्या प्रतिबंधासाठी औषधसाठा, आरोग्य पथके व रुग्णवाहिका सज्ज ठेवाव्यात, तर महसूल, पोलीस, परिवहन, कृषी, दूरसंचार व इतर विभागांनी आपत्कालीन परिस्थितीत तात्काळ प्रतिसादासाठी आवश्यक मनुष्यबळ व यंत्रणा उपलब्ध ठेवण्यावर भर देण्यात आला. नदी, नाले व धरण परिसरातील नागरिकांना वेळोवेळी सतर्कतेच्या सूचना देण्याबाबतही संबंधित विभागांना निर्देशित करण्यात आले. जिल्हाधिकाऱ्यांनी आपत्ती व्यवस्थापनात समन्वय, तत्परता आणि नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्याचे आवाहन केले. बैठकीस विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

# अमोल कोल्हे यांच्या तक्रारीची विभागीय आयुक्तकार्यालयाकडून दखल

प्रतिनिधी । जळगाव

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ४ ची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याबाबत वारंवार सूचना व शासन परिपत्रक निर्गमित करूनही अपेक्षित सुधारणा दिसून न आल्याने या संदर्भात सर्वोच्च न्यायालयात रिट याचिका क्रमांक ९९०/२०२१ दाखल करण्यात आली होती.**

या याचिकेवर दि.१७ ऑगस्ट २०२३ रोजी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांच्या अनुषंगाने तसेच राज्य मुख्य माहिती आयुक्त यांच्या २२ डिसेंबर २०२३ च्या शिफारशी लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने या अंमलबजावणीसंदर्भात शासन परिपत्रक जारी केले आहे. या परिपत्रकाची प्रभावी अंमलबजावणी व्हावी यासाठी माहितीचा अधिकार कार्यकर्ता फेडरेशनचे जिल्हाध्यक्ष अमोल कोल्हे यांनी केलेल्या तक्रारीची नाशिक विभागीय आयुक्त कार्यालयाने दखल घेतली आहे. त्यानुसार नाशिक विभागातील जळगाव,धुळे, नंदुरबार, अहिल्यानगर आणि नाशिक या पाचही जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त कार्यालयातील सर्व संबंधित विभागप्रमुखांना निर्देश दिले आहेत,अशी माहिती अमोल कोल्हे यांनी दिली.

# एमआरपी नियंत्रित करणारा कठोर कायदा करावा

## संसदेत प्रश्न उपस्थित करणार : खासदार स्मिता वाघ यांची ग्वाही

प्रतिनिधी । अमळनेर

**उत्पादनांवरील मनमानी किंमतींवर नियंत्रण आणण्यासाठी कठोर कायदा करण्यात यावा, यासाठी येत्या संसदीय अधिवेशनात संसदेत प्रश्न उपस्थित करून चर्चा घडवून आणणार असल्याचे आश्वासन खासदार तथा संसदरत्न पुरस्कार विजेत्या स्मिता वाघ यांनी अखिल भारतीय ग्राहक पंचायतच्या शिष्टमंडळाला दिले.**



अखिल भारतीय ग्राहक पंचायतच्या पदाधिकाऱ्यांनी खासदार स्मिता वाघ यांची भेट घेऊन त्यांना दुसऱ्यांदा संसदरत्न हा प्रतिष्ठित पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल शाल, पुष्पगुच्छ व संस्थेची दैनंदिनी देऊन सत्कार केला. यावेळी एमआरपी संदर्भातील विविध समस्या व ग्राहकांची होत असलेली आर्थिक फसवणूक याबाबत सविस्तर निवेदन त्यांना देण्यात आले.

सदर निवेदनात नमूद केले आहे की, अनेक उत्पादक कंपन्या वस्तूंवर अवास्तव व मनमानी एमआरपी छापून ग्राहकांची आर्थिक लूट करीत आहेत. याविरोधात अखिल भारतीय ग्राहक पंचायतने देशभर जनजागृती व आंदोलन सुरू केले असून विविध राज्यांतील जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, लोकप्रतिनिधी व संसद सदस्यांना निवेदने देण्यात येत आहेत. तसेच सोशल मीडियाच्या माध्यमातून जनजागृती करून नागरिकांच्या सह्याही संकलित करण्यात येत आहेत. या आंदोलनाचा एक भाग म्हणून मध्य महाराष्ट्र प्रांत सचिव व जळगाव जिल्हा पालक डॉ.अनिल देशमुख यांच्या नेतृत्वाखाली अमळनेर येथे खासदार स्मिता वाघ, उपविभागीय अधिकारी मयूर भंगाळे तसेच तहसीलदार रुपेशकुमार सुराणा यांना निवेदन देण्यात आले. यावेळी तालुका पालक व जिल्हा सहसचिव भाईसाहेब मकसूद बोहरी, प्रांत महिला आयाम प्रमुख अॅड. भारती अग्रवाल, प्रभारी जिल्हाध्यक्ष सतीश देशमुख, सहसचिव सुधाकर पाटील, तालुका अध्यक्ष स्मिता चंद्रात्रे, सुभाष पाटील घोडेगावकर, साहित्यिक भाऊसाहेब देशमुख, भडगाव तालुका उपाध्यक्ष निलेश बडगुजर, एरंडोल तालुका अध्यक्ष तथा ज्येष्ठ पत्रकार मुल्लाजी नुरुद्दीन आदी पदाधिकारी उपस्थित होते.डॉ. अनिल देशमुख यांनी जीवनावश्यक वस्तू, अन्नधान्य व औषधांवरील वाढत्या एमआरपीमुळे ग्राहकांची होत असलेली फसवणूक अनेक उदाहरणांसह मांडली. त्यांनी सांगितले की, वस्तूंवरील एमआरपी आधीच अनेक पटींनी वाढवून त्यावर मोठ्या सवलतींचे आमिष दाखवून ग्राहकांची दिशाभूल केली जाते. एकावर एक फ्री, ३० टक्के सूट अशा जाहिरातींमधून ग्राहकांची फसवणूक होत असल्याचा आरोपही त्यांनी केला. अखिल भारतीय ग्राहक पंचायतने निवेदनाद्वारे उत्पादनांच्या निर्मिती खर्चावर आधारित वैज्ञानिक सूत्र निश्चित करून त्यावर मर्यादित २० ते ३० टक्के नफा ठेवण्याची व्यवस्था निर्माण करावी, तसेच त्यासाठी स्वतंत्र प्राधिकरण स्थापन करून एमआरपीची पडताळणी करावी, अशी मागणी केली आहे.

## गांधली जलशुद्धीकरण केंद्रातील पाणीचोरी प्रकरणात गुन्हा दाखल

प्रतिनिधी । अमळनेर

**गांधली येथील जलशुद्धीकरण केंद्रातून शासनाच्या पाणीपुरवठा योजनेतील पाणी अवैधरित्या चोरी केल्याप्रकरणी अखेर अमळनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नगरपरिषदेचे मुख्याधिकारी गणेश शिंदे साहेब यांच्या लेखी आदेशानंतर सदरची कारवाई करण्यात आली.**

याप्रकरणी अमळनेर पोलीस ठाण्यात भाग-५ सीसीटीएनएस क्रमांक २६२/२०२६ नुसार भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत कलम ३(५), ६२, २२३ तसेच सार्वजनिक मालमत्ता नुकसान प्रतिबंध अधिनियम १९८४ च्या कलम ३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणात बारकू कृष्णा सोनवणे (वय ५४), सुपरवायझर, गांधली पंप हाऊस व जलशुद्धीकरण केंद्र यांनी फिर्याद दिली आहे. तर आरोपी म्हणून जावेद कमरुद्दीन शेख (खासगी प्लंबर) आणि कासरीन शेख उर्फ दादा (नगरपरिषद कर्मचारी, मेहतर कॉलनी, अमळनेर) यांची नावे नमूद करण्यात आली आहेत. फिर्यादीनुसार, दि.६ एप्रिल रोजी गांधली जलशुद्धीकरण केंद्र परिसरात जलशुद्धीकरण टाकीच्या मुख्य आउटलेट पाइपलाईनमधून शासनाच्या पाणीपुरवठा योजनेतील पाणी मोठ्याप्रमाणात चोरी होत असल्याचे निदर्शनास आले.

या प्रकारामुळे शासनाच्या मालमत्तेचे नुकसान होत असून सार्वजनिक पाणीपुरवठा व्यवस्थेलाच फटका बसत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

## थोडक्यात

### ट्रॅक्टर पलटी झाल्याने तरुणाचा मृत्यू



**पाचोरा ।** तालुक्यातील लोहटार येथे शेतात खताची वाहतूक करणारे ट्रॅक्टर लोहटार अंतुर्ली रोडवर असलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्राजवळ पलटी झाल्याने २४ वर्षीय सागर दीपक पाटील यांचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच गावातील भागवत पाटील व अमोल पाटील यांनी जखमी अवस्थेत सागरला पाचोरा ग्रामीण रुग्णालयात दाखल केले वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी नंतर त्यास मृत घोषित केले. या घटनेची पाचोरा पोलीस स्टेशन येथे अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. सागर हा एकुलता एक मुलगा होता त्यांच्या पश्चात आई आणि एक बहिण असा परिवार आहे.

### अनोळखी इसमाच्या मृतदेहाची ओळख पटविण्याचे आवाहन

**भुसावळ ।** येथील रेल्वे यार्डातील अप लूप लाईन खंबा क्र.३१ जवळ एक अनोळखी इसम रेल्वे अपघातात मृत पावल्याबाबत ऑन ड्युटी स्टेशन उपप्रबंधक भुसावळ यांच्या माहितीवरून रेल्वे पो. स्टे.त दि.२६ मे २०२६ रोजी अकस्मात मृत्यु रजि. क्र. ५४/२०२६ प्रमाणे नोंद करण्यात आली आहे. मयत इसम वय ३१ वर्ष, उंची पाच फुट चार इंच, रंगाने निमागोरा, शरिर बांधा सडपातळ, डोक्यावरील केस काळे, चेहर लांबट, नाक सरळ, अंगात तपकिरी रंगाचा टी-शर्ट, निळ्या रंगाची लोअर पँट, संदेश नाव अशा वर्णनाचा असून या इसमास ओळखणाऱ्यांनी रेल्वे पोलिस ठण्याशी ०२५८२-२२२३३८ संपर्क साधावा, असे आवाहन तपासी अंमलदार पोलिस हवालदार संजय निकम ९८२३१३०५१० यांनी केले आहे.

## गोवंश हत्या, अवैध वाहतूक रोखण्यासाठी बजरंग दल, विहिंपचे निवेदन

प्रतिनिधी । पारोळा

**आगामी बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर पारोळा तालुका आणि परिसरात गोवंश हत्या तसेच अवैध वाहतूक रोखण्यासाठी विश्व हिंदू परिषद, बजरंग दल प्रखंडच्यावतीने पोलिसांना निवेदन देण्यात आले. प्रशासनाने वेळीच कारवाई न केल्यास उद्भवणाऱ्या परिस्थितीला पोलीसच सर्वस्वी जबाबदार राहतील, अशी भूमिका संघटनेने घेतली आहे.**



निवेदनात तालुक्यात सध्या काही विशिष्ट ठिकाणी कत्तलीच्या उद्देशाने मोठ्याप्रमाणावर गोवंश जमा करण्यात आले आहे. पोलिसांनी गोवंश तात्काळ ताब्यात घ्यावे. पोलिसांनी यावर वेळीच कायदेशीर कारवाई केली नाही तर बजरंग दल स्वतः पुढाकार घेऊन हा गोवंश ताब्यात घेईल. या दरम्यान निर्माण होणाऱ्या तांत्रिक व कायदेशीर अडचणींना पोलीस प्रशासन जबाबदार राहील, असा इशारा देण्यात आला आहे. ईदच्या काळात होणारी अवैध वाहतूक रोखण्यासाठी तालुक्याच्या मुख्य मार्गांवर आणि नाक्यावर कडक पोलीस बंदोबस्त व नाकाबंदी लावण्यात यावी, अशी मागणीही यात करण्यात आली आहे. निवेदन देतेवेळी बजरंग दलाचे विशाल महाजन, जयवंत चौधरी, समाधान धनगर, किशोर चव्हाण, आबा महाजन, रवींद्र मराठे, अॅड. रवींद्र पाटील, प्रताप पाटील आदी उपस्थित होते.

## चोपड्यात बालविवाह रोखण्यात यश

प्रतिनिधी । चोपडा

**शहर पोलीस स्टेशन पोनि पवन देसले व पथकातील युवराज वाळुंज, विलास पारधी, निलेश वाघ यांनी गुप्त माहितीच्या आधारावर एका अल्पवयीन मुलीचा बालविवाह तात्काळ वेळेत भेट करून हस्तक्षेप करून यशस्वीरित्या थांबवला आहे.**



पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, शहरात एका ठिकाणी बालविवाह होणार होता.घटनेची माहिती मिळताच चोपडा शहर पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन विवाह रोखला. पोलिसांनी दोन्ही कुटुंबांचे समुपदेशन करून बालविवाहाच्या कायदेशीर परिणामांची जाणीव करून दिली. मुलीचे वय १८ वर्षांपेक्षा कमी असल्याने हा विवाह बेकायदेशीर असल्याचे स्पष्ट करण्यात आले. विवाहाच्या वेळी मुलीचे वय १८ वर्षे आणि मुलाचे वय २१ वर्षे पूर्ण असणे आवश्यक आहे. या वयापेक्षा कमी वयाच्या मुला-मुलींचा विवाह हा कायदेशीर गुन्हा मानला जातो. बालविवाह प्रतिबंध कायद्यानुसार, बालविवाह करणे, लावून देणे किंवा त्यास प्रोत्साहन देणे या गुन्ह्यासाठी कठोर शिक्षेची तरतूद आहे. बालविवाह करणारे वर-वधू, त्यांचे पालक, नातेवाईक, लग्न लावणारे भटजी, पत्रिका छापणारे, मंगल कार्यालय व्यवस्थापक, केटरर्स सर्व दोषी मानले जातात. या कारवाईत पोलीस निरीक्षक पवन देसले यांच्या पथकाने कारवाई केली.

## पारोळा येथे संत भीमा भोई जयंती साजरी

प्रतिनिधी । पारोळा

**येथील भोई समाजाच्या वतीने वतीने संत शिरोमणी श्री संत भिमा भोई यांची १७६ वी जयंती उत्साह व भव्य मिरवणूक भोई गल्ली ते शिवाजी महाराज पुतळा जवळ संपन्न करण्यात आली.**



पूजन नगराध्यक्ष चंद्रकांत बी पाटील यांच्या हस्ते झाले. माजी नगराध्यक्ष गोविंद एकनाथ शिरोळे माजी नगराध्यक्ष, नगरसेवक नितीन सोनार, नगरसेवक भूषण टिपरे, माजी नगरसेवक प्रकाश भोई, माजी नगरसेवक भीमराव जावळे, दशरथ भोई, सुनील भोई, डॉ कैलास सोनवणे, अरुण मोरे, सुरेश मोरे, बारकु भोई, ज्ञानेश्वर भोई, यांच्यासह समाज बांधव व मान्यवर उपस्थित होते.

## ऐन उन्हाळ्यात वीज कंपनीकडून वीज कपात

प्रतिनिधी । रावेर


सावदा विभाग अंतर्गत शेतकऱ्यांसाठी दि.२५ मे रोजी वीज मंडळाने दैनंदिन होणारा आठ तासाचा वीस पुरवठा चक्क दोन तासांनी कमी केल्याने ऐन उन्हाळ्यात शेतकऱ्यांची त्रेधा उडाली आहे.शेतकरी वीज कंपनी विरोधात आक्रमक होण्याचे चित्र निर्माण झाले आहे. ऐन उन्हाळ्यात सुमारे ४५ अंश तापमान असून या तापमानाने आधीच केळी व बागायती पिके होरपळून निघत आहे. त्यातच वीज वितरण कंपनीने शेतकऱ्यांच्या वीज मोटार पंपाला होणारा वीजपुरवठा तब्बल दोन तासांनी कमी केल्याने केळी बागायतदारांचे मोठे पिकांचे व आर्थिक नुकसान होणार आहे. शेतकऱ्यांनी शेती करावी कशी? अशी चिंता शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे. दरम्यान किमान पूर्वीप्रमाणे आठ तास तरी वीस पुरवठा सुरळीत व नियमित मिळावा यासाठी शेतकरी आक्रमक झाले असून संताप व्यक्त करीत आहे. संबंधित चिनावल वीज उपकेंद्र तसेच कार्यकारी वीज अभियंता सावदा विभाग, सहाय्यक पोलीस निरीक्षक सावदा पोलीस स्टेशन, यांना या आशयाचे निवेदन चिनावल, वडगाव, विवरा, वाघोदा व परिसरातील शेतकऱ्यांनी दिले. यात सदर २० पुरवठा पूर्वीप्रमाणे सुरळीत न झाल्यास तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.



## जामनेरला विधान परिषदेच्या पार्श्वभूमीवर प्रताप पाटील यांची भेट

प्रतिनिधी । जामनेर

**स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विधान परिषद निवडणुकीसाठी जळगावची जागा शिवसेना (शिंदे गट), किंवा भाजपा लढविणार महायुतीमध्ये हे अजून निश्चित झाले नसले तरी मैत्रीपूर्ण लढतीच्या तयारीत असलेल्या शिवसेनेचे इच्छुक उमेदवार मंत्री गुलाबराव पाटील यांचे चिरंजीव प्रतापराव लाबराव पाटील यांनी भेटी गाठी सुरू केल्या आहेत. त्या पार्श्वभूमीवर त्यांनी जामनेर येथे कृषी उत्पन्न बाजार समिती कार्यालयात भेटी घेऊन मतदारांशी संपर्क साधला.**



यावेळी त्याठिकाणी वेगळ्या एका कार्यक्रमासाठी आलेल्या जामनेर नगरीच्या नगराध्यक्ष साधनाताई महाजन, भाजपा जिल्हाध्यक्ष चंद्रकांत बाविस्कर कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती अशोक पाटील, भाजपाचे उपनगराध्यक्ष डॉ. प्रशांत भोंडे, जामनेर न. पा भाजपा गटनेत्या संध्या पाटील यांचे पती जितेंद्र पाटील, भाजपा नगरसेवक रवींद्र झाल्टे, अतिस झाल्टे यांच्यासह पदाधिकाऱ्यांशी प्रताप पाटील यांनी संवाद साधला. जळगाव विधान परिषदेची जागा ही महायुतीतर्फे भारतीय जनता पक्षासाठी सोडावी यासाठी भाजपाचे संकटमोचक ना. गिरीश महाजन यांचे प्रयत्न सुरू असतानाच दुसरीकडे महायुतीतील घटक पक्ष शिवसेना शिंदे गटातर्फे जळगावची जागा शिवसेनेला सोडावी यासाठी जोरदार हालचाली सुरू आहे. वरिष्ठांनी दखल घेतली नाही तर शिवसेना स्वतंत्र मैत्रीपूर्ण लढतीच्या तयारीत असल्याचेही बोलले जात आहे. या संदर्भात नुकतीच शिवसेनेच्या सर्व आमदार व पदाधिकाऱ्यांची बैठक संपन्न होऊन शिवसेनेने जोरदार हालचाली सुरू केल्या आहेत. याच पार्श्वभूमीवर शिवसेनेचे मंत्री ना. गुलाबराव पाटील यांचे चिरंजीव प्रतापराव पाटील यांना शिवसेनेतर्फे लढतीसाठी हिरवा कंदील मिळाल्याचे वृत्त असून त्यांनी पूर्वतयारी म्हणून भेटीगाठी सुरू केल्या आहेत. जामनेर मध्ये येऊन त्यांनी नगराध्यक्ष साधना महाजन तसेच जिल्हाध्यक्ष चंद्रकांत बाविस्कर व इतर नगरसेवकांच्या भेटी घेतल्याचेही समजते.

## कत्तलीसाठी जाणाऱ्या गायी पकडल्या

प्रतिनिधी । चोपडा

**चोपडा शहरात दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये कत्तलीसाठी गायींना ताब्यात घेऊन क्रूरपणे चारा पाणी न करता बांधून ठेऊन ठार मारण्याचा इराद्यात असलेल्या आरोपींविरुद्ध पोलिसात गुन्हा नोंदविण्यात आला असून गायी ताब्यात घेण्यात आल्या आहेत.**

या बाबत पोलिसांनी हजर जबाबीपणा ठेवत तात्काळ कारवाई केल्याने गो भक्तांनी आनंद व्यक्त केला आहे. पहिल्या घटनेत शहरात रात्री ११ वाजेचा सुमारास भोकरवाडा चौकीमागे सार्वजनिक शौचालयाजवळ तापुरत्या पत्री शेडमध्ये मुबारक अली मुजफर अली( वय ३० वर्षे रा भोकरवाडा चोपडा )याचे मालकिचे तात्पुरत्या पत्री शेडमध्ये एकूण २,५०,०००/- रु किंमतीचे एकुण ०७ गुरे त्यात ०२ गायी व ०५ गो-हे (बैल) असे दाटीवाटीने, जखळून क्रूर रितीने बांधुन त्यांना कोणत्या प्रकारे चारा पाण्याची सोय न करता व त्यांना कोणत्याही प्रकारचे कानाला टॅग न लावता गुरे बांधुन ठेवलेले मिळून आले म्हणून गुन्हा फिर्यादीवरुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## ग्राहकांचं अस्सल सोनं 'माणक ज्वेलर्स'

### चोपडा तालुक्यातील एकमेव कॅरेटोमीटरयुक्त सुवर्ण दालन

प्रतिनिधी । चोपडा

**भारतीय संस्कृतीत सुवर्ण खरेदीला विशेष धार्मिक आणि सामाजिक महत्त्व आहे. शुभ कार्य, लग्नसमारंभ किंवा गुंतवणूक म्हणून सोने खरेदीला नेहमीच प्राधान्य दिले जाते. मात्र, सोन्याच्या वाढत्या किंमतीमुळे ग्राहक अधिक सजग झाले असून शुद्ध आणि प्रमाणित सोन्याची मागणी वाढली आहे.**







याच पार्श्वभूमीवर चोपडा येथील 'माणक ज्वेलर्स'ने ग्राहकांच्या विश्वासाला अधिक बळ देण्यासाठी अत्याधुनिक कॅरेटोमीटर मशीनची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. विशेष म्हणजे, कॅरेटोमीटर असलेले हे चोपडा तालुक्यातील एकमेव सुवर्ण दालन ठरले आहे.

सन १८९३ पासून सुवर्ण व्यवसायात असलेल्या टाटीया परिवाराने पाच पिढ्यांपासून ग्राहकांचा विश्वास जपला आहे. बदलत्या काळानुसार आधुनिक तंत्रज्ञान स्वीकारत संचालक प्रवीण टाटीया आणि नवीन टाटीया यांनी ग्राहकहिताला सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. त्याचाच भाग म्हणून शोरूममध्ये अत्याधुनिक कॅरेटोमीटर मशीन बसविण्यात आले आहे.

**काय आहे कॅरेटोमीटर?**

कॅरेटोमीटर हे सोन्याची शुद्धता आणि त्यातील धातूंचे प्रमाण अचूकपणे तपासणारे आधुनिक उपकरण आहे. या मशीनद्वारे दागिन्यांना कोणतीही हानी न पोहोचवता काही सेकंदात सोन्याची गुणवत्ता तपासली जाते. पूर्वी शुद्धता तपासण्यासाठी दागिने घासावे किंवा वितळवावे लागत होते. मात्र, आता अवघ्या १० ते ३० सेकंदांत ९ कॅरेट ते २४ कॅरेटपर्यंतच्या सोन्याची शुद्धता स्क्रीनवर स्पष्ट दिसून येते. विशेष म्हणजे, ९९.९९ टक्क्यांपर्यंत अचूक मोजमाप या मशीनद्वारे शक्य होते.

ग्राहकांचा विश्वास अधिक दृढ

सोनं खरेदी करताना ग्राहक मोठी रक्कम खर्च करतात. त्यामुळे त्यांना मिळणारं सोनं दर्जेदार आणि शुद्ध असणं आवश्यक आहे. ग्राहकांची फसवणूक टाळण्यासाठी आणि त्यांना योग्य परतावा मिळावा यासाठी माणक ज्वेलर्सने ही सुविधा सुरू केली आहे. सोने खरेदी किंवा मोड देताना ग्राहकांना त्यांच्या दागिन्यांची गुणवत्ता प्रत्यक्ष मशीनद्वारे तपासून दाखविली जाते. त्यामुळे ग्राहकांचा विश्वास अधिक दृढ होत आहे.

**एचयुआयडी हॉलमार्क**

कॅरेटोमीटरप्रमाणेच माणक ज्वेलर्सने ग्राहकांच्या हितासाठी शोरुममध्ये एचयुआयडी हॉलमार्क असलेले स्वर्ण आणि चांदीचे आभूषण उपलब्ध करुन देले आहेत. जे शुद्धता आणि गुणवत्तेची हमी देतात. एचयुआयडी हॉलमार्क हे शुद्धतेची हमी देणारे अधिकृत मानक असून ग्राहक आपल्या फोनद्वारे एचयुआयडीच्या माध्यमातून दागिण्यांचा संपुर्ण तपशील पाहू शकतात. चांदीच्या आभूषणांमध्ये एचयुआयडी हॉलमार्क देणारे माणक ज्वेलर्स हे एकमेव दालन आहे.

**ग्राहकांनी जागरूक राहावे**

ग्राहक त्यांच्या कष्टाचा पैसा सोन्यात गुंतवतात. त्यामुळे त्यांनी सोन्याच्या शुद्धतेबाबत जागरूक राहणे गरजेचे आहे. ग्राहकांच्या हितासाठी आम्ही कॅरेटोमीटर मशीनची सुविधा उपलब्ध करून दिली असून प्रत्येक व्यवहारात पारदर्शकता ठेवण्याचा आमचा प्रयत्न असतो, असे माणक ज्वालर्सचे संचालक प्रवीण टाटीया आणि नवीन टाटीया यांनी सांगितले.

## वराडसिम येथे धरती आबा योजनेची पाहणी

प्रतिनिधी । भुसावळ

तालुक्यातील वराडसिम-येथे धरती आबा योजनेचे टप्पा दोनचे कामे पूर्ण करण्यासाठी यावल येथील अधिकारी आले होते. येथील टप्पा दोनच्या कामांची यादी तयार होत आहे. यासाठी गावात आरोग्य शिबिर लावण्यात आले, त्याचप्रमाणे आयुष्यमान कार्ड व आधार कार्ड काढण्यात आले. कार्यक्रमाला उपस्थित जोगोलखोरी वराडसिम येथील ग्रामविकास अधिकारी चंदू सावकारे, यावल येथील शासकीय कर्मचारी एस.एस. माथेड, पी.एन. फेगडे, एच.एन. महाले, एम.जी. तायडे, जावेद तडवी हे अधिकारी धरती आबा योजनेच्या टप्पा दोन चे कामे पाहण्यासाठी आले होते.